दै.बीड

# सुपरफास्ट

www.beedsuperfast.com

• संपादक : अतुल शंकरराव जाधव •

• beedsuperfastgmail.com •






■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक ६० ■ सोमवार दि. ०२ मार्च, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.

■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-60 ■ Monday 02 March, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4


# ७४ वर्षे जुनी शाळा बंद करण्याला आ.नमिता मुंदडांचा कडाडून विरोध

## पाणीप्रश्नावरूनही सरकारचे वेधले लक्ष



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शुक्रवारी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आपल्या मतदारसंघातील शिक्षण आणि पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नांवरून सरकारचे लक्ष वेधले. सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होत त्यांनी केज येथील १९५२ पासून सुरू असलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा वाचवण्यासाठी आणि रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही ऐतिहासिक वारसा असलेली संस्था असून १९५२ पासून या शाळेने हजारो अधिकारी, इंजिनिअर्स आणि डॉक्टर घडवले आहेत. एकेकाळी १८०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत २०२३ पासून पटसंख्या कमी झाल्याचे कारण देत शिक्षक पदे कमी करण्यात आली आणि अखेर शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा फटका केज शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत असल्याचे मुंदडा यांनी सभागृहात नमूद केले. विशेष म्हणजे, नगरपंचायतीने या शाळेची सुमारे चार एकर जागा 'अनयूज्ड' म्हणजेच वापराविना असल्याचे घोषित करून ती इतर कारणांसाठी वापरण्याचा ठराव केला आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून २६ जानेवारी २०२६ रोजी ५०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत ही शाळा पुनरुज्जीवित करण्याचा ठराव केला आहे. शैक्षणिक उपयोगासाठी असलेली जागा अन्य कारणांसाठी वापरणे हे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर अन्याय करणारे असून नगरपंचायतीचा हा ठराव रद्द करून शाळा पूर्ववत सुरू करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी मंत्री महोदयांकडे केली. शिक्षण क्षेत्रातील या प्रश्नासोबतच नमिता मुंदडा यांनी मतदारसंघातील पाणीटंचाईच्या मुद्द्यावरही सरकारला अवगत केले. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे सध्या अपूर्ण किंवा अर्धवट स्थितीत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील महिला आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. उन्हाळा जवळ येत असल्याने ही परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता आहे. शासनाने या कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या गुत्तेदारांची जबाबदारी निश्चित करावी आणि ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरून नागरिकांना नियमित आणि शुद्ध पाणी उपलब्ध होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंदडा यांनी मांडलेल्या या मुद्द्यांमुळे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर आता सरकार काय भूमिका घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जवळपास २ हजार स्वच्छता दूत सहभागी; डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान अन् नगरपंचायतचा उपक्रम

**केज । प्रतिनिधी**

शहरात आज ऐतिहासिक अशी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून, यामध्ये २ हजारांपेक्षा जास्त स्वच्छता दूत सहभागी झाल्याने शहर चकाचक दिसत आहे. हा उपक्रम डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आला. याला केज नगरपंचायत आणि सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला आहे. या स्वच्छता हा आरोग्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. मात्र आज बऱ्याच शहर किंवा ग्रामीण भागात याकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने घाणीचे साम्राज्य पसरले दिसतं. मात्र अशा ठिकाणी स्वच्छता मोहिमेला सुरुवात व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रसिद्ध डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या वतिने केज » पान २ वर




## लातूरमध्ये प्रथमच लीडलेस पेसमेकर इम्प्लांटेशन डॉ. दिपक कटारे व डॉ. परमेश्वर खोडवे यांचे यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ग्लोबल हार्ट केयर लातूर चे संचालक डॉ दिपक कटारे आणि डॉ परमेश्वर खोडके यांच्या टीम ने नुकतीच लीडलेस पेसमेकर हि अत्याधुनिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. मराठवाड्यामध्ये छ. संभाजीनगर नंतर अशा प्रकारची शस्त्रक्रिया प्रथमच लातूर मध्ये यशस्वी पाने पार पाडण्यात आली. लीडलेस पेसमेकर म्हणजे अतिशय छोटा केवळ अडीच सेंटीमीटर लांब आणि साधारण २ ग्रॅम वजनाचा पेसमेकर हार्ट मध्ये बसवणे. कार्डिओलॉजि मध्ये mikra हा लीडलेस पेसमेकर म्हणजे इंजिनिअरिंग आणि मेडिकल क्षेत्रांमध्ये झालेल्या प्रगतीचा जिवंत नमुना आहे. डॉ. दिपक कटारे यांनी याविषयी बोलताना पुढे सांगितले की, लीडलेस पेसमेकर म्हणजे कसलाही टाका नाही कसलीही तार नाही कसलीही एक्सटर्नल बॅटरी नाही. ज्या पेशन्ट ना पुन्हा » पान २ वर



## सायं.दैनिक रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

येथील सायं.दैनिक रिपोर्टरचे संपादक तथा मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांच्या आई लियाकतबी सिकंदर शेख यांचे शनिवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मृत्युसमयी त्या ७४ वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून त्या आजारी होत्या, त्यांच्यावर ठिकठिकाणच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले, मात्र शनिवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. आज रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता खासबाग रोडवरील तकिया मस्जिद परिसरातील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफणविधी करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात शेख तय्यब, शेख मुबीन ही दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. शेख कुटुंबियाच्या दुःखात दैनिक बीड सुपरफास्ट परिवार सहभागी आहे.

## सरपंचाच्या कुटूंबातील सदस्याचे शासकीय जमिनीवर अतिक्रमण

### वांगी बु.सरपंचास जिल्हाधिकारी यांनी केले अपात्र

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील वांगी बु. येथील सरपंचाच्या कुटूंबातील सदस्याने शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले याबाबत तहसिलदारांनी अतिक्रमण काढुन घेण्याबाबत सांगून देखील सरपंचाने हे अतिक्रमण काढले नाही. परिणामी जिल्हाधिका-यांनी या सरपंचावर अपात्रतेची कारवाई केली आहे.

तालुक्यातील वांगी - बु, ता. माजलगांव, जि. बीड येथील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक ही २०२३ साली पार पडली. तसचे सरपंच पद हे थेट जनतेतून असल्याने अजय गुलाबराव जाधव यांची सरपंच म्हणुन निवड झाली. मात्र सरपंच यांच्या आई यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून त्यावर बांधकाम देखील केलेले होते. तसेच सदरील अतिक्रमणाची नोंद ही ग्रामपंचायतीच्या अतिक्रमण नोंद वहीमध्ये सन १९९९ पासुन अस्तित्वात आहे. सदरील अतिक्रमण हटविण्याबाबत ग्रामपंयाचत कार्यालयाने मा. तहसिलदार यांच्या निर्देशानुसार संबंधित अतिक्रमण धारक यांना नोटिस देखील बजावण्यात आली होती, मात्र तरी देखील सरपंच यांच्या आई यांनी सदरील अतिक्रमण काढून घेतले नाही. त्यानंतर तक्रारदार श्री. वैजनाथ उत्तमराव जाधव, रा. वांगी-बु, ता. माजलगांव, जि. बीड यांनी मुंबई उच्च न्यायालयातील विधिज्ञ ड. ईश्वर वाघ यांच्या मार्फत मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयारत ग्रामपंचायत अधिकनियम » पान २ वर

## आरटीआय प्रवेशातील अंतराची जाचक अट रद्द करा

### जे.डी.शाह यांची मुख्यमंत्र्यांसह शिक्षण मंत्र्यांकडे मागणी



**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाने आरटीआय (मोफत) २५% प्रवेश प्रक्रियेसाठी निवासा पासून १ किलोमीटर अंतराची जी अट घातली आहे, ती राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अन्यायकारक ठरत आहे. ही जाचक अट रद्द करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी समाजसेवक जे.डी.शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना लेखी पत्राद्वारे केली आहे. लेखी निवेदनाद्वारे राज्य स्तरावर ही मागणी केली आहे. उदाहरण म्हणून बीड शहरा बाबत सांगायचे झाले तर, शहराचा विस्तार पाहता, येथील बहुतांश नामांकित शाळा जसे की, गुरुकुल शाळा, पोद्दार, ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, भगवान इंग्लिश स्कूल, मोईल स्कूल , अशा व अनेक नामवंतीक शाळा शहराच्या एका टोकाला किंवा मुख्य वस्तीपासून दूर अंतरावर स्थित आहेत. बीड शहरासह जिल्ह्यात गेवराई, अंबाजोगाई,केज, धारूर, वडवणी,परळी, माजलगाव, पाटोदा, आष्टी , शिरूर या तालुक्यात हिच परिस्थिती आहे की एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचे शाळांचे अंतर साधारणपणे ५ ते ६ किलोमीटर आहे. अशा परिस्थितीत केवळ १ किमी अंतराची अट सक्तीची केल्यामुळे,

## विक्रीसाठी चालेला १३ लाखांचा गांजा अंबाजोगाईत पकडला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अंबाजोगाई येथे पोलिसांनी मोठी कारवाई करत चारचाकी वाहनातून विक्रीसाठी नेला जात असलेला सुमारे १३ लाख ७० हजार ८६० रुपयांचा गांजा जप्त केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा व अंबाजोगाई शहर पोलिसांनी संयुक्तरीत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अंबाजोगाई येथील सटवाजी नगर परिसरातील ट्रिमसिटी येथे चारचाकी वाहनातून अवैध गांजाची वाहतूक होणार आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व अंबाजोगाई शहर पोलीस यांनी संयुक्त सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, प्लास्टिकच्या पोत्यांमध्ये ओलसर स्वरूपाचा, तीव्र वास येणारा सुमारे २८ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी हा गांजा व वाहतुकीसाठी वापरलेले चारचाकी वाहन जप्त केले. जप्त » पान २ वर



## वाळू माफियांना पोलिसांचा दणका!

## मध्यरात्री अहमदनगरला जाणारा हायवा पकडला; ३८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी वाळू माफियांविरोधात मोठी कारवाई केली आहे. ठोंबळसांगवी नदीपात्रातून विनापरवानगी वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन हायवा पोलिसांनी पकडले असून, सुमारे ३८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील ठोंबळसांगवी नदीपात्रातून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वाळूचा अवैध उपसा करून ती वाळू अहिल्यानगर शहरात विक्रीसाठी नेली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्या पथकाने बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास नदीपात्रात धाड टाकली. यावेळी » पान २ वर






## केज शहरातील तरुण शिक्षकाचा दुर्दैवी मृत्यू

**केज । प्रतिनिधी**

येथील रहिवासी तथा तालुक्यातील नांदूर घाट येथील मूकबधिर विद्यालयामध्ये शिक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या एका तरुण शिक्षकाचा अपघाती मृत्यू झाला आहे. केज शहरातील रहिवासी खमरोद्दिन सदरोद्दीन फारुखी (३८) हे तालुक्यातील नांदूर घाट येथील मूकबधिर शाळेत शिक्षक या पदावर कार्यरत होते. मात्र शुक्रवारी रात्री आठच्या दरम्यान शाळेतून केज कडे येत असताना केज बीड रोडवरील बरड फाट्यानजीक दुचाकी आणि ट्रॅक्टर ट्रॉलीच्या झालेल्या अपघातामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. सदरील अपघात झाल्यानंतर त्यांना लातूर येथे उपचारासाठी हलवण्यात आले. मात्र शनिवारी पहाटे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये सर्वांना परिचित असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून खमरुद्दीन फारोखी यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अंत्यविधी केज येथील फारोखी कब्रस्तानमध्ये चारच्या दरम्यान करण्यात येणार आहेत.



# होळी आणि धुलीवंदन - दुष्ट प्रवृत्तीचा नाश व एकतेचे प्रतीक




होळी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वपूर्ण सण असून तो वाईट आवर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. भक्त प्रल्हाद आणि होलिका कथा सर्वांना माहीतच आहे. फाल्गुन पौर्णिमेला होलिका दहन करू नकारात्मकता जाळून टाकली जाते. या दिवशी होळीच्या अग्नीत आपल्या मनातील नकारात्मक विचार दुःख आणि अपप्रवृत्ती जाळून नवीन आणि पवित्र आयुष्याची सुरुवात करावी. होळी रंगांचा सण म्हणून ओळखला जातो. या दिवशी सर्व भेदभाव विसरून एकमेकांना रंग लावून आनंद साजरा केला जातो. ज्यामुळे सामाजिक बंद घट्ट होतात होळीच्या अग्नीत लाकूड जाळल्याने त्या उष्णतेने वातावरणातील अनेक कीटक आणि सूक्ष्मजीव नष्ट होतात असे मानले जाते. विविध ठिकाणी होळी वेगवेगळ्या प्रकारे व नावाने साजरी केली जाते. महाराष्ट्रात समिधा म्हणून लाकडे गोळा करून मंत्रोच्चारात जाळतात. होळीच्या भोवती बोंबा मारत प्रदिक्षणा घालतात. होळीला नैवेद्य म्हणून नारळ अर्पण करतात. दुसऱ्या दिवशी धुळवड करतात. होळीची रक्षा अंगाला फासली जाते. ओल्या मातीत लोळण ही घेतात. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण केली जाते. होळीला वेगवेगळ्या नावाने उच्चारले जाते, जसे की होली का दहन,हुताशनी महोत्सव, फाग फागुन, दोला यात्रा, काम दहन, कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुनोत्सव, वसंतोत्सव असे म्हणतात. देशी नाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच शिमगा असा अपभ्रंश तयार झाला असे मानले जाते. ग्रामीण भागात आजही शिमगा असेही उच्चारले जाते. होळी रे होळी पुरणाची पोळी हे वाक्य आजही ऐकायला मिळते. होळीच्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य होळीला दाखविला जातो. आजच्या काळात आपण पाहतो की प्रत्येक समाजाने आपला एक रंग निवडून समाजाला वेगवेगळ्या रंगात विभागले आहे. रंग हा कोणत्या एका समाजाचा नसून निसर्गाने केलेली एक उधळण आहे. होळी हा सण सर्वद्वेष दुष्ट प्रवृत्ती विसरून बंदोबाने एकतेने एकत्र येऊन साजरा करण्याचे प्रतीक आहे. चला तर मग होळीच्या या पवित्र दिवशी आपले बंद घट्ट करून आनंदाने होळी साजरी करूया.

**प्रा.मनीषा गिराम करपे**
**बीड**

## पान १ आणि ४ वरुन...

### लातूरमध्ये प्रथमच...

पुन्हा पेसमेकर इन्फेक्शन होत असेल अशा पेशंट साठी लीडलेस पेसमेकर म्हणजे वरदान आहे. आमच्या पेशंट ला पहिल्यांदा डाव्या छातीवर पेसमेकर सोलापूर येथे २०२१ साली बसवला होता पण तो पेसमेकर इन्फेक्ट झाला आणि काढावा लागला. २०२४ मध्ये पुण्याला पुन्हा एकदा पेसमेकर बसवला आणि यावेळी पेसमेकर छातीच्या उजव्या बाजूवर बसवण्यात आला परंतु या वेळी सुद्धा तो इन्फेकट झाला. अशा दुर्मिळ रुग्णांमध्ये लीडलेस पेसमेकर म्हणजे जणू काही वरदानच. मुंबई हैद्राबाद या शहरांमध्ये सुद्धा ही प्रक्रिया तुरळक ठिकाणीच केली जाते आणि अशा प्रकारची अत्याधुनिक शस्त्रक्रिया आपल्या भागात प्रथमच करण्यात आली आहे. सदरील लिडलेस पेसमेकर यशस्वी रित्या बसवून रुग्णाचा त्रास कमु केला व त्यास पुन्हा नव्या उमेदीने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली याबद्दल डॉ. दिपक कटारे, डॉ. परमेश्वर खोडवे व टीम चे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### अशोक नगर जि.प.शाळेत...

अन्नाची गुणवत्ता नियमितपणे तपासावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून जोर धरत आहे. संबंधित शिक्षण विभाग व प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### ग्रामरोजगारांचा मोर्चा...

निर्णयाची अंमलबजावणी करावी, १६ महिन्याचे प्रलंबित मानधन अदा करून जबाबदार कर्मचारी अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी, दुय्यम रोजगार

सहाय्यकांच्या १ वर्षासाठी केलेल्या नियुक्त्या रद्द कराव्यात, मनरेगा कामावरील स्थानिक राजकीय हस्तक्षेप (ठेकेदारी) मोडून काढणे त्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात यावी, प्रत्येक महिन्याला वैयक्तिक खात्यात मानधन जमा करावे,मानधन थकवणाऱ्या ग्रामपंचायतीवर योग्य ती कार्यवाही करावी, सार्वजनिक कामावर मजूर उपस्थिती बाबतची पडताळणी सरपंच/ग्रामसेवक यांनी करावी या मागणीसाठी आज ग्रामरोजगार सहाय्यकांनी जिल्हा कचेरीवर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आंदोलकांनी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर केले आहे. या मागण्या मंजूर झाल्या नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी जिल्हाभरातील ग्रामरोजगार उपस्थित होते.

### विवेकानंद बाल विद्यामंदिरात...

उत्साहाचे व सांस्कृतिक अभिमानाचे दर्शन घडले. कार्यक्रमाचे उद्घाटन दगडू लोमटे यांच्या हस्ते झाले. प्रा. शैलजा बरुरे व शितल बोधले या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दुपारच्या सत्रात डॉ. सिद्धेश बिराजदार, सुदर्शन रापतवार, निशा चौसाळकर व संध्या शिंदे-सोळंके यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दगडू लोमटे यांनी विद्यार्थ्यांशी हसत-खेळत संवाद साधला. शितल बोधले यांनी कविता लेखनाची शैली, भाषेची निवड व अभिव्यक्ती याविषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात निशा चौसाळकर व संध्या शिंदे-सोळंके यांनी कथाकथन, वाचनसंस्कृती व साहित्याचे महत्त्व पटवून दिले. सुदर्शन रापतवार यांनी मराठी भाषा दिनाचे व मातृभाषेचे महत्त्व स्पष्ट केले, तर डॉ. सिद्धेश बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका स्वरूपा डिग्रसकर यांनी केले. सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील मानसी अकोलकर व अभंग कदम, श्रीराम यादव, यश राडकर यांनी प्रभावीपणे पार पाडले. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संघटनकौशल्य व मराठी भाषेप्रती असलेली आस्था प्रकर्षाने जाणवली. विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी स्वकष्टातून आयोजित केलेले हे आगळे-वेगळे आद्यकवी मुकुंदराज स्वामी कुमार साहित्य संमेलन शाळेच्या इतिहासात संस्मरणीय ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### मंत्री अतुल सावे यांचा...

व रुग्णांच्या नातेवाईकांकडून कौतुक केले जाऊ लागले आहे.

बीड तालुक्यातील युवा नेते तथा सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी काल मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस बीड जिल्हा रुग्णालयामध्ये काल व परवा जन्म झालेल्या नवजात कन्यांना व त्यांच्या मातांना वस्त्रदान करून व फळ वाटप करून साजरा केला आहे या केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांचे शहरवाशियांकडून तसेच रुग्णांच्या नातेवाईकांकडून आभार व्यक्त केले जाऊ लागले आहेत.

### सुनेत्रा पवार यांची...

अजित पवारांच्या आदर्शावर पुढे जायचं आहे. आता आपण नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आपली वाटचाल करणार आहोत. आपण सर्वजण याठिकाणी एकत्र आलो आहोत. सगळ्या प्रांतातील लोकं याठिकाणी आले आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली.

### हिंदवी स्वराज्य संस्थापक...

प्राप्त केले व स्वतःच्या तारुण्यात स्वराज्य निर्मितीचे स्वप्न पाहिले व साकार केले . आजची बहुतांशी तरुणाई शॉर्टकट पद्धतीने झटपट मोठे होण्याचा प्रयत्न करत आहेत . अनेकांना देव देश धर्म या शब्दांविषयी आत्मजागृती नाही . आई वडील व गुरु यांच्या विषयी श्रद्धा नाही अशा तरुणांकडून समाजाचे व राष्ट्राचे भले होणार आहे काय? बहुतांशी तरुणाई व्यसनाच्या आहारी जात आहे हे राष्ट्राच्या दृष्टीने भयानक आहे .

गिलासो मे जो डूबे फिर नही उभरे जिंदगानी में !

हजारो बह गये बंद बोतलों के पाणी मे ।

आज आमच्या छत्रपती शिवरायांच्या तरुणाईला वाचवणे अत्यावश्यक आहे परंतु आज विद्यालयांची नव्हे तर मद्यालयांची संख्या वाढते आहे . कित्येक वर्षांपासून अनेक विद्यालयांमध्ये शिक्षकांची रिक्त जागेवर भरती झालेली नाही .शाळा महाविद्यालय बंद पडत आहे याची शासनाला खंत आहे का? समाजाला चिंता आहे का ? कोणीही आमदार खासदार या संदर्भात मोर्चा काढत नाही संप करत नाही . विद्यार्थ्यास शिक्षकांनी रागावल्यावर पालक शाळेत भांडायला येतात परंतु कित्येक वर्षापासून अनेक विषयांचे शिक्षक शाळेमध्ये रिक्त जागेवर भरलेले नाही तिथे पालक काहीच बोलत नाही, भांडत नाही राज्यकर्त्यांना प्रश्न विचारत नाहीत . हे केवढ विडंबन आहे . शिक्षकां अभावी शाळा बंद पडत आहेत . परंतु मद्यालयाला भरभराट आहे. अशावेळी स्वदेशी तरुणाई घडणार का बिघडणार ? टपरी छाप नव्हे तर शिवछत्रपतींच्या विचारांची तरुणाई देशाला तारणार आहे . म्हणून आज घराघरात व मनामनात शिवचरित्रांचा जागर झाला पाहिजे . विद्यार्थी मित्रांनो आई - वडिलांच्या व गुरुजनांच्या विद्यापीठातून शिवचरित्र घडले हे लक्षात ठेवा. मातृ पितृ तथा गुरु भक्त बना! असा हितोपदेशी सल्ला प्रेरक वैद्य यांनी दिला .

संस्कार शिवजयंती कार्यक्रम प्रसंगी संस्कार पिठासनावर अन्य प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध गणिततज्ञ अध्यापिका श्रीमती पूजा रणभोर यांची व मुख्याध्यापक दीपक सरदे पर्यवेक्षक रघुनाथ तावरे यांची विशेष उपस्थिती होती . श्रीमती रणभोर यांनी दर्पण दिनानिमित्त दर्पण दिन व दर्पणकार यांच्या जीवनावर प्रभावी भाष्य करत उपस्थितांना मार्गदर्शन केले . दर्पण दिन म्हणजे काय तो का साजरा केला जातो हे समजावून सांगितले .

प्रमुख अतिथिंच्या उपस्थितीत छत्रपती शिवप्रभूंच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले .सदरील कार्यक्रमाचे श्रीमती रश्मी पारगावकर यांनी सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन केले . याप्रसंगी अनेक बालवक्त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले तर प्रमुख वक्त्यांच्या उपस्थितीत रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत विविध स्पर्धेत सुयश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला . याच वेळी वैद्य सरांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून श्रीमंतयोगी राजे शिवछत्रपतींच्या संदर्भात ज्या गौरवास्पद काव्यपंक्ती राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामींनी तयार केल्या शब्दस्वरूप शिवचरित्राचे सामूहिक गायन घेतले . सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्रीमती रश्मी पारगावकर यांनी केले .

### जवळपास २ हजार...

शहरात प्रथमच आज रविवारी (दि.१) सकाळी सात ते दहा या वेळेत ऐतिहासिक महास्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये नगरपंचायत सह आदी सामाजिक संस्था आणि समाजसेवकांनी सहभाग घेतला. प्रथम या मोहिमेचे उद्घाटन रमेश आडसकर यांच्या हस्ते करण्यात आले. नगरअध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, गट नेते. हारूनभाई ईनामदार, व्यापारी फुलचंद भाई जाधव, हनुमंत भोसले, पत्रकार, अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती. सकाळी ७ ते १० या तीन तासत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. थोरात यांचे हॉस्पीटल, शिक्षक कॉलनी, विठाईपूरम, कामगार नगर, उमरी रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बालाजी मंदिर, भवानी चौक, मंगळवार पेठ, कानडी रोड, इत्यादी भागात स्वच्छता केली. यामुळे शहर चकाचक दिसून आली.

### विक्रीसाठी चालेला १३...

मुद्देमालाची एकूण किंमत १३,७०,८६० रुपये इतकी आहे. या प्रकरणी प्रतीम राम तरकसे (वय २७, रा. आडस, ता. केज, जि. बीड) याच्यासह त्याचे साथीदार प्रतिक भगवान पाटोळे, अजय पाटोळे (दोघेही रा. आसर्डोह, ता. धारूर, जि. बीड) व अजय देवकर (रा. अंबोरा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८३/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, तसेच सहाय्यक पोलिस अधीक्षक रवीकिरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, अंबाजोगाई शहरचे पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, पोलिस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, शिंदे तसेच पोलिस कर्मचारी यांच्या पथकाने केली.

### आरटीआय प्रवेशातील...

शहराच्या मध्यवर्ती किंवा जुन्या शहरात राहणाऱ्या पालकांना आरटीई पोर्टलवर या प्रमुख शाळांचे पर्याय निवडणे अशक्य झाले आहे. हि बाब जे.डी.शाह यांनी आपल्या पत्रात पुढे नमूद केले की, 'शिक्षण हक्क कायदा २००९' चा मूळ उद्देश समाजातील वंचित घटकांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी देणे हा आहे. मात्र, ५ ते ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या शाळांसाठी १ किलोमीटरची अट

लावणे तांत्रिकदृष्ट्या चुकीचे असून, यामुळे राज्यातील हजारो पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत आहेत. खासगी शाळांचे भरमसाठ शुल्क भरणे गरीब पालकांना परवडणारे नसल्याने, शासनाने ही अट तातडीने रद्द करावी. तसेच पूर्वीप्रमाणेच ० ते १ किमी, १ ते ३ किमी आणि ३ ते ८ किमी पर्यंतची अंतराची लवचिक मर्यादा पुन्हा लागू करण्याबाबत सुधारित आदेश निर्गमित करावेत, अशी आग्रही विनंती वजा मागणी मुख्यमंत्री .शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे समाजसेवक जे.डी.शाह यांनी केली आहे.

### सरपंचाच्या कुटूंबातील...

१९५८ च्या कलम १४ (ज) (३) प्रमाणे रितसर तक्रार दाखल केली.सदरील तकारीच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना नोटिसा बजावुन, प्रत्यक्ष स्थळाचा पंचनामा करण्याचे निर्देश दिले. पंचनाम्यामध्ये संबंधित शासकिय जमिनीवर सरपंच यांच्या आईचे अतिक्रमण आढळुन आले, मात्र सरपंच यांचे पद वाचविण्यासाठी त्यांचे काही नातेवाईक यांनी सदरील अतिक्रमण हे सरपंच यांच्या आईचे नसुन त्यांचे आहे असे सांगु लागले, मात्र मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी अभिलेखावरी सर्व कागदपत्रांचा, पंचनाम्याचा, स्थळ पाहणी अहवाल, तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या जनाबाई विरूध्द महाराष्ट्र शासन या निकालातील निष्कर्षांचा सखोल विचार करून सरपंच यांनी त्यांच्या कुटुंबीयांमार्फत शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेले सिध्द झाल्याने सरपंच यांना ग्रामपंचायत अधिकनियम १९५८ च्या कलम १४ (ज) (३) नुसार पदावरून अपात्र घोषित केले.

### वाळू माफियांना पोलिसांचा...

वाळूने भरलेले दोन हायवा पोलिसांना आढळून आले.पोलिसांनी या कारवाईत दोन हायवा आणि त्यातील वाळू असा एकूण ३८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. पोलीस अंमलदार सतीश पैठणे यांच्या फिर्यादीवरून या प्रकरणी दोन व्यक्तींविरुद्ध अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही धडाकेबाज कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे, पोलीस हवालदार भगवान देवकर, पोलीस अंमलदार सतीश पैठणे, हनुमंत खांडेकर आणि होमगार्ड तुषार वामन यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

### जयभवानी कारखान्याचा ४३ वा...

तोड/वाहतूक करून कारखान्यास आणलेल्या ट्रॅक्टर, मिनी ट्रॅक्टर व बैलगाडी तसेच हार्वेस्टर मालक ज्यांनी सर्वात जास्त विना पाचट ऊस/तोड वाहतूक करून आणलेला आहे अशा तोडणी वाहतुक ठेकेदारांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहनपर बक्षीस देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक जगन्नाथराव शिंदे, श्रीराम आरगडे, कुमारराव ढाकणे, अप्पासाहेब गव्हाणे, नंदकुमार गोरडे, बाबुराव काकडे, गणपत नाटकर, नारायणराव नवले, संदिपान दातखिळ, कार्यकरी संचालक राजेंद्र खाडप, सर्व खातेप्रमुख, उपखातेप्रमुख, विभागप्रमुख, तालुक्यातील पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरीक, ऊस बागायतदार, ऊस तोडणी/वाहतूक ठेकेदार, हंगामी कामाचे ठेकेदार, कर्मचारी/कामगार इत्यादी उपस्थित होते.

### सोलर युनिट जमा...

आरोप होत आहे. वीज बिल दुरुस्तीसाठी कार्यालयात वारंवार फेऱ्या मारूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याने ग्राहक त्रस्त झाले आहेत. सोलर यंत्रणा बसवूनही अपेक्षित लाभ मिळत नसल्याची भावना नागरिकांत आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. महावितरणने पारदर्शकता ठेवून तातडीने बिल दुरुस्त करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महामार्गाच्या कामात तुटणारे वडाचे झाड रामनगरकरांनी वाचवले अन् जगवलेही!


## अवघ्या एका महिन्यात वडाला फुटली पालवी ; ग्रामस्थांच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

दि.२६ : धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रामनगर येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. त्यामुळे सर्व्हिस रोडला अडथळा ठरत असलेले गावातील अनेक वर्षांपासून उभे असलेले भलेमोठे वडाचे झाड तोडण्याची वेळ आली. मात्र रामनगर येथील ग्रामस्थांनी वेळीच सावध भूमिका घेत हे झाड तोडण्यापूर्वीच त्याचे प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला होता. ठरल्याप्रमाणे वडाच्या झाडाचे गावातीलच छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे प्रत्यारोपण करण्यात आले. अवघ्या महिन्याभराच्या काळात या वडाला हिरवीगार पालवी फुटली असून वडाचे झाड वाचवले आणि जगवलेही आहे. कित्येक वर्षे माणसांना सावली देणारे, पक्ष्यांना आसरा देणारे वडाचे झाड महामार्गाच्या कामामुळे तुटणार याचे मोठे दुःख होते. मात्र प्रत्यारोपण करण्याची संकल्पना ग्रामस्थांना सूचली आणि ती

**वडाचे प्रत्यारोपण केल्यानंतर त्याला पालवी फुटेल का? असा प्रश्न मनात होता. सर्व ग्रामस्थांनी मिळून प्रामाणिक हेतूने वडाचे प्रत्यारोपण केले, त्याची निगा राखली आणि अवघ्या महिन्यातच त्याला पालवी फुटली आहे, याचा मनस्वी खूप आनंद होत आहे.**
**–केशव कदम, रामनगर**

प्रत्यक्षात अंमलातही आणण्यात आली. वडाच्या झाडाचे प्रत्यारोपण केल्यानंतर त्याला लवकर पालवी फुटावी, ते जळू नये यासाठी त्याला नियमित पाणी, शेण खत टाकण्यात आले. प्रत्यारोपणानंतर अवघ्या एका महिन्यातच या वडाला नवीन पालवी फुटली आहे. त्यामुळे रामनगरकरांनी केवळ झाड वाचवले नाही, तर ते यशस्वीपणे जगवले असल्याचे स्पष्ट झाले आहे. गावकर्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमासाठी ग्रामस्थांसह उड्डाणपुलाचे काम करणारी मे.कालूवाला कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हरियाणा) कंपनीनेही मोलाचे सहकार्य केल्यामुळे त्यांचेही ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.





## शिवजयंती निमित्त शिवशाहीर पोवाड्याचा कार्यक्रमाचे मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**पालवन । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील पालवण येथील सामाजिक कार्यामध्ये कायम अग्रेसर असलेली सामाजिक संघटना व सर्वसामान्यांचा आधार देणारी युवापर्व या सामाजिक संघटनेच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. दि.१ मार्च २०२६ रविवारी रोजी शिवशाहीर शरद नवले सर यांचा पोवाड्यांचा कार्यक्रम आयोजित केला आहे याच या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची विशेष उपस्थिती असणार आहे या अनुषंगाने पालवण येथील युवापर्व सामाजिक संघटने कडून शिवजयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे तसेच दि १ मार्च रविवारी सायंकाळी ठिक ८ वाजता भव्य शिवशाहीर पोवाड्याचा कार्यक्रमाचे आयोजन या शिवजयंती निमित्त युवा पर्व सामाजिक संघटनेच्या कडून करण्यात आलेले आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व शिवप्रेमी व समाज बांधवांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवावी असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे. बीड तालुक्यातील पालवण येथील युवा पर्व सामाजिक संघटनेच्या माध्यमातून आजवर अनेक सामाजिक कार्य करण्यात आलेले आहेत. याच सामाजिक संघटनेचा दि.१ मार्च रविवारी रोजी शिवजन्मोत्सव सोहळा वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी शिवशाहीर पोवाड्याचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे, तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी या शिवशाहीर पोवाड्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# एलसीबीने जबरी चोरी करणारे चार आरोपी केले अटक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात ऑनलाईन पैसे टाकण्याच्या बहाण्याने युवकास मोटारसायकलवर बसवून जबरी चोरी करणाऱ्या चौघांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेला मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी फिर्यादी शेख इम्रान दस्तगीर (वय २८, रा. होळ ता. केज) यांनी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे ७ फेब्रुवारी २०२६ रोजी तक्रार दाखल केली होती. फिर्यादी हे आडस फाटा येथील सानिका बिअर बारसमोर थांबले असताना तिघेजण मोटारसायकलवर आले. ऑनलाईन पैसे टाकतो असे सांगून त्यांनी फिर्यादीस आडस रोडकडे नेले व त्याच्याकडील रोख रक्कम व मोबाईल जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. तक्रारीवरून गु.र. नं. ४८/२०२६ कलम ३०९(४), ३(५) बीएनएसप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी अज्ञात आरोपींचा शोध सुरू केला. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सुमित अरुण गायकवाड (वय २०), विनय गोविंद जगधने (वय १९), विश्वजीत विश्वास गंडले (वय १९) व शिवम जनक कसबे (वय १९, सर्व रा. अंबाजोगाई) यांना अंबाजोगाई शहर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मोबाईल तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करून पुढील तपासासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई नवनित काँवत (पोलीस अधीक्षक, बीड), चेतना तिडके (अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई) व शिवाजी



बंटेवाड (स्थानिक गुन्हे शाखा, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, हवालदार मारोती कांबळे, रामचंद्र केकाण, गोविंद भताने, सचिन आंधळे, विकी सुरवसे व चालक अतुल हराळे यांचा सहभाग होता. अंबाजोगाई शहरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी सतर्कता वाढविली आहे.

## कालिकादेवी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**शिरूर का. । प्रतिनिधी**

येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात करण्यात आले आहे. या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ग्रामीण साहित्यिक मा. भास्कर बडे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्रशांत शिंदे गटशिक्षण अधिकारी शिरूर का तसेच संध्या कुलकर्णी गट साधन व्यक्ती शिरूर का.यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या विज्ञान प्रदर्शन स्पर्धेसाठी प्रथम, द्वितीय,तृतीय, उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा कनिष्ठ गट व वरिष्ठ गट या गटांमध्ये होणार आहे.तरी शिरूर तालुक्यातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी केले आहे.

## एनएमएमएस परीक्षेमध्ये रामराव पाटील विद्यालयाचे घवघवीत यश



**केज । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षा मध्ये केज येथील रामराव पाटील शाळेने यशाची परंपरा कायम राखत ३३ पैकी १४ मुलांनी यश संपादन केले आहे यामध्ये जाधव पंकज बब्रुवान या विद्यार्थ्यांनी १२८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटाकावलेला आहे, तसेच घाडगे उत्कर्ष याने १०४ गुण, महाजन आदित्य याने १००,गुण चाटे राजेंद्र यांनी ९६ गुण मिळवलेले आहेत या विद्यार्थ्यांना श्री पोटभरे श्री देवकते श्री इर्शाद श्री कळेकर श्री गोरे श्री गायकवाड,श्री नाईकनवरे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री खोसे व माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य पाटील,प्रशासकीय प्रताप मोरे यांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापकांचा यावेळी शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती गिरी यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## पोलीस अधीक्षक यांना महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या वतीने निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड न्यायालय परिसरात नोटरी अँड राम पांडुरंग डोंगरे यांच्यावर झालेल्या गंभीर मारहाण, जीवित धोका निर्माण करणाऱ्या धमक्या व कायदा व्यवसायात अडथळा निर्माण करण्याच्या प्रकरणी आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा नोंद करून कठोर दंडात्मक कारवाई करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांना महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या वतीने प्रदेशाध्यक्ष व ऑल इंडिया नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अँड सय्यद सिकंदर अली यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष अँड



राहुलकुमार राका, प्रदेश कार्यकारणी सदस्य नोटरी अँड सय्यद अजहर अली, नोटरी अँड यासिर पटेल ,जिल्हा कार्याध्यक्ष अँड रामजी दहिवाळ , महिला जिल्हाध्यक्षा अँड विद्या गायकवाड, जिल्हा उपाध्यक्षा अँड संगीता वीर, अँड छाया वाघमारे, नोटरी अँड भाऊसाहेब लटपटे, नोटरी अँड शरद कोठावळे, नोटरी अँड राजेंद्र बन, अँड मुकुंदराज खेत्रे , नोटरी अँड सुरेश हंगे , नोटरी अँड जाधवर आदींसह बहुसंख्य नोटरी बांधव आवर्जून उपस्थित होते.

## प्रितमताई मुंडे यांना राज्यसभेवर संधी द्या : शेख इरशाद

**बीड । प्रतिनिधी**



माजी खासदार प्रितमताई मुंडे यांनी गेल्या दहा वर्षांत बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी संसदेत दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कर्तृत्वाचा विचार करून पक्षाने त्यांना राज्यसभेवर संधी द्यावी, अशी आग्रही मागणी भाजप अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख इरशाद यांनी केली आहे.शेख इरशाद यांनी आपल्या मागणीत म्हटले आहे की, प्रितमताई मुंडे यांनी दोन वेळा बीड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आणि कृषी क्षेत्रातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचा विचारांचा वारसा त्या समर्थपणे पुढे नेत असून, सर्वधर्मीय जनतेमध्ये त्यांची प्रतिमा एक अभ्यासू आणि संयमी नेत्या म्हणून आहे. पक्षाच्या पडत्या काळात आणि संघटनात्मक बांधणीत प्रितमताईंनी नेहमीच मोलाची भूमिका बजावली आहे. जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाज आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी त्यांचा थेट संवाद आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत प्रितमताईंसारख्या नेतृत्वाची वरिष्ठ सभागृहात (राज्यसभा) गरज आहे, असे मत शेख इरशाद यांनी व्यक्त केले.दोन वेळा खासदार म्हणून कामाचा दांडगा अनुभव. जिल्ह्याच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून आणलेला मोठा निधी. सर्व जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांना सोबत घेण्याची वृत्ती. भारतीय जनता पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम.या मागणीमुळे आता राजकीय वर्तुळात प्रितमताईंच्या पुनर्वसनाबाबत चर्चा सुरू झाली आहे. पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व या मागणीची दखल प्रीतम ताई मुंडेना खासदार करावे अशी मागणी शेख इरशाद भाई यांनी केली.

## रोटरीच्या पुढाकारातून १ मार्च रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन
### सोळा संघटनांकडून सहभागाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

समाजातील गरजू रुग्णांसाठी रक्ताची वाढती गरज लक्षात घेता दि. १ मार्च २०२६, रविवार रोजी बीड शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन बीड शहरातील विविध सामाजिक, व्यापारी, व्यावसायिक व वैद्यकीय संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात रोटरी क्लब ऑफ बीड (अध्यक्ष - रो. विकास उमापूरकर), रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन (इंजि. रो.राहुल बोरा), रोटरी क्लब ऑफ बीड सिटी (रो. भागवतराव ढाकणे), सातीराम अण्णा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन (संस्थापक अध्यक्ष श्री अशोक दादा ढोले पाटील), माहेश्वरी प्रगती मंडळ (श्री सुरेंद्र कासट), क्रेडाई संघटना (श्री सुरेंद्र कासट), बीड जिल्हा सी.ए. व टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन (सी. ए. बी. बी. जाधव), स्वराज्य मुद्रा सामाजिक प्रतिष्ठाण



(सौ. अनिता ताई भोसले), बीड जिल्हा व्यापारी संघटना (कार्याध्यक्ष - श्री अशोक शेटे), गौतम लब्धी फाउंडेशन (श्री जितेंद्र बोरा), योगा दिपमाळ ग्रुप (श्री जितेंद्र बोरा), बीड शहर व्यापारी संघटना (श्री प्रकाश कानगावकर), इंडियन मेडिकल असोसिएशन - खच- (डॉ. अनंत मुळे), बीड जिल्हा कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअरिंग असोसिएशन (इंजि. श्रीपाद चिंचोलकर), शेतकरी राजा सामाजिक समिती (श्री रोहित धुरंधरे) तसेच वैद्यकीय प्रतिनिधी संघटना, बीड (युनिट सेक्रेटरी - श्री जगन्नाथ निकम) यांचा सहभाग आहे. सदर रक्तदान शिबिर हे दि.१ मार्च रविवार रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २ वाजेपर्यंत,श्री. गुरुनानक मंदिर, श्री. स्वामी समर्थ मंदिराजवळ,सहयोग नगर, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान प्रक्रिया पूर्णतः सुरक्षित व वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पार पाडली जाणार आहे. रक्तदान हे जीवनदान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आवर्जून यावे, असे आवाहन प्रो. चे. रो.अक्षय शेटे मो.नं.८०८७१५८७८७., सी.ए. रो.आदेश नहार (मो.नं.९२७०००८८००) व रो. सचिन लातूरकर ( मो.नं.९४०३६०८१७१) यांनी केले आहे.

## गेवराईत सावता महाराज मंदिर जीर्णोद्धार सोहळा

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील संत शिरोमणी सावता महाराज मंदिराचे नूतन बांधकाम जिर्णोद्धार सार्वजनिक मंदिर कमिटीच्या वतीने तसेच संयुक्त प्रयत्नातून विठ्ठल श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर जिर्णोद्धार सोहळा, तर गुरुवर्य परमपूज्य हरिभक्त परायण दिलीप बाबा घोगे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले तसेच श्री संत सावता महाराज मंदिराचा पुनर्बांधणी सोहळा मोठ्या थाटात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या नूतनीकरणामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दि. २६फेब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी संत सावता महाराज तसेच महादेव मंदिराचा जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. भाविकांच्या देणगीतून मंदिराची उभारणी केल्याबद्दल बांधकाम समिती सदस्यांना सन्मानित करण्यात आले. जीर्णोद्धार व भूमिपूजन सोहळा निमित्ताने यजमान महिला व पुरुषांच्या हस्ते विधिवात पूजा करण्यात आली महिलांनी साड्या व वस्त्र परिधान केले होते. मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई व परिसर सडा-रांगोळ्यांनी सजवण्यात आला होता.

# बीडच्या एकदिवसीय संपातून उभा राहिलेला प्रश्न: शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांच्या मागण्या अखेर कधी मान्य होणार?

बीड जिल्ह्यात झालेला एकदिवसीय संप हा केवळ एका दिवसाचा आंदोलन नव्हता, तर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांचा आणि असंतोषाचा आवाज होता. शासकीय कार्यालये बंद राहिली, शैक्षणिक कामकाजावर परिणाम झाला; पण सर्वात मोठा प्रश्न असा आहे की कर्मचारी आणि शिक्षकांना वारंवार रस्त्यावर का उतरावे लागते? शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांचे म्हणणे आहे की त्यांच्या न्याय्य मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. जुनी पेन्शन योजना लागू करणे, सेवा निश्चितीतील त्रुटी दूर करणे, बढती प्रक्रियेत पारदर्शकता आणि थकीत देयके अदा करणे - हे प्रश्न अजूनही मार्गी लागलेले नाहीत. या मागण्या अतिरिक्त सुविधा नसून मूलभूत हक्कांशी संबंधित आहेत. कोरोना काळातील १८ महिन्यांच्या महागाई भत्त्याचा (DA) मुद्दा विशेष चर्चेत आहे. शासनाने देयक देण्याचे संकेत दिले असले तरी प्रत्यक्षात अद्याप रक्कम मिळालेली नाही. जर हा हक्क मान्य आहे, तर देयकात विलंब का? त्या १८ महिन्यांत महागाईने कुणाला सूट दिली होती का? दुसरीकडे लोकप्रतिनिधींच्या भत्ते, प्रवास सुविधा, सुरक्षा आणि इतर सोयींसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. सभा, प्रचार आणि राजकीय कार्यक्रमांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होतो. मात्र शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या बाबतीत निधी अपुरा का वाटतो? शिक्षण संघटना प्रहारची भूमिका या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण संघटना प्रहार या संघटनेचे नाव पुढे येते. ही संघटना प्रामुख्याने मराठी शिक्षकांचे प्रतिनिधित्व करते; मात्र उर्दू आणि इतर भाषिक शिक्षकांच्या प्रश्नांवरही आवाज उठवत आली आहे. हीच भारताच्या संस्कृतीची खरी ओळख आहे - भाषा किंवा समुदाय यापलीकडे जाऊन न्यायासाठी उभे राहणे. कर्मचारी आणि शिक्षकांचा सरळ प्रश्न आहे: जर राज्याचा खजिना जनतेचा असेल, तर जनतेची सेवा करणारे शिक्षक आणि कर्मचारी त्याचे हक्कदार का नाहीत? एका बाजूला सांगितले जाते की निधी मर्यादित आहे, कायदेशीर अडचणी आहेत. परंतु दुसऱ्या बाजूला आमदार आणि खासदारांच्या भत्त्यांमध्ये वाढ सहज मंजूर होते. नवीन गाड्या, नवीन सुविधा, नवीन भत्ते - सर्व काही तत्काळ मंजूर होते. मग प्रश्न असा उभा राहतो: जो शिक्षक एका मुलाचे भविष्य घडवतो, तो फक्त पगार घेणारा कर्मचारी आहे का? की तो राष्ट्रनिर्मितीचा शिल्पकार आहे? शिक्षकांचे महत्त्व आणि बदलते सामाजिक वातावरण शिक्षक केवळ धडा शिकवत नाही, तर मूल्ये, एकता आणि मानवतेचा संदेश देतो. तो केवळ परीक्षेची तयारी करून घेत नाही, तर पुढील पिढीचे भविष्य घडवतो. मग हाच वर्ग सतत तणाव, असुरक्षितता आणि दुर्लक्षाचा सामना का करतो? महागाई वाढत आहे, जबाबदाऱ्या वाढत आहेत; पण वेतनवाढ, सेवा सुरक्षा आणि जुनी पेन्शन योजना यांसारखे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. बढती प्रक्रियेत विलंब आहे. उर्दू आणि इतर भाषिक शिक्षकांच्या हक्कांबाबतही अनिश्चितता कायम आहे. आजच्या राजकीय वातावरणात भाषा आणि धर्माच्या नावावर विभाजनाची भीती व्यक्त केली जाते. पण भारताची खरी ताकद त्याच्या विविधतेत आणि एकतेत आहे - जिथे मराठी, उर्दू, हिंदी, तमिळ आणि सर्व भाषा एकत्र नांदतात. जर शिक्षक दुर्बल झाला तर समाज दुर्बल होईल. जर शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले तर देशाचे भविष्य धोक्यात येईल. खरा प्रश्न प्रश्न हा नाही की संप किती दिवस चालेल, खरा प्रश्न आहे - न्याय कधी मिळणार? शासनाने शिक्षक आणि शासकीय कर्मचाऱ्यांना ओझे नव्हे तर संपत्ती समजावे. संवाद साधावा, पारदर्शक निर्णय घ्यावेत आणि सर्वांशी समान वागणूक द्यावी. कारण राष्ट्रनिर्मिती संसद भवनात नव्हे, तर वर्गखोलीत होते. आणि शिक्षक समाधानी असेल, तरच भारत खऱ्या अर्थाने मजबूत बनेल.



:: लेखक ::
**सय्यद फारूक अहमद खाजगी**

## एनएमएमएस परीक्षेच्या निकालात भालचंद्र विद्यालय अग्रेसर; २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र, सत्कार समारंभ उत्साहात

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

भारत सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या National Means-cum-Merit Scholarship (NMMS) परीक्षेच्या निकालात बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून विद्यालयाने तालुक्यात आपला ठसा उमटवला आहे. NMMS ही परीक्षा आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने घेतली जाते. ही परीक्षा इयत्ता ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी असते. परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी दरम्यान दरवर्षी १२,००० म्हणजेच दरमहा १,००० शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी मोठा आधार ठरते. या



परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण होते, आत्मविश्वास वाढतो आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणा मिळते. तसेच ही परीक्षा विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि शैक्षणिक क्षमता तपासणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक अंगद हावळे व इतर सहशिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशासाठी दादासाहेब सुपेकर, राहुल रसाळ, गणेश आजबे, गणेश घरत आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दै.बीड सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
सोमवार दि. ०२ मार्च, २०२६ पान- ४
Happy Morning

# जयभवानी कारखान्याचा ४३ वा गळीत हंगामाचा सांगता समारंभ



## १११ दिवसामध्ये कारखान्याने ५,२४,७८७ मेट्रिक टन गाळप पूर्ण

**गेवराई । प्रतिनिधी**

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगाव येथील महंत दत्ता महाराज गिरी आणि जयभवानी कारखान्याचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्या शुभहस्ते विधिवत पुजा करुन संपन्न झाला. यावेळी बोलतांना कारखान्याचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, कारखान्याच्या ५० वर्षाच्या काळामध्ये कारखान्याने मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. आदरणीय शिवाजीराव दादांनी पाहिलेले स्वप्न साकार होतांना दिसून येत आहे. हा गळीत हंगाम सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतूक ठेकेदार, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी/कामगार, संचालक आणि हितचिंतकांनी केलेल्या सहकार्यातुन यशस्वी झालेला आहे.१११ दिवसामध्ये कारखान्याने ५२४७८७ मेट्रिक टन गाळप पूर्ण केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान चे महंत ह.भ.प. गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांनी आशिर्वादपर मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बोलताना जयभवानी कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे म्हणाले की गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये कार्यक्षेत्रात १४६५६ हेक्टर नोंदीचा ऊस उपलब्ध होता. या हंगामाकरीता मोठे व मिनी ट्रॅक्टर मिळून ४५० व टायर बैलगाडी १८४ व १५ हार्वेस्टर अशी ऊस तोड यंत्रणा उभारली होती. या हंगामामध्ये सुरूवातीपासून प्रती दिन ५००० ते ५५०० मे.टना प्रमाणे गाळप करून

अवघ्या १११ दिवसामध्ये कारखान्याचे ५२४७८७ मे.टन गाळपाचा टप्पा पूर्ण केला. व त्यापासून ४५३१२० क्विंटल साखर उत्पादन केले. तसेच या हंगामातील डिस्टिलरीचे उत्पादन सुरू असून आज अखेर ४३ लाख ४५ हजार बल्क लिटर स्पिरीट उत्पादन झाले असून डिस्टिलरी माहे मे २०२६ अखेर पर्यन्त चालू राहणार आहे. या हंगामा मधील ऊस बिलाचे पेमेंट रु.२७७५ प्रती मे. टनाप्रमाणे शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा केलेले आहेत. उर्वरित ऊस बिल व तोडणी वाहतूक बिल (कमिशन डिपॉझिटसह) लवकरच अदा करणार आहोत. तसेच कारखान्यास सन २०२४-२५ मधील देशपातळीवरील नामांकीत संस्था वसंतदादा शुगर इंस्टीट्यूट पुणे यांचे कडून उत्कृष्ट तांत्रिक क्षमता तृतीय पुरस्कार मिळालेबद्दल कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी/ कामगार यांचे कारखाना व्यवस्थानाचे वतीने अभिनंदन केले. व गळीत हंगाम २०२५-२६ यशस्वी होणेसाठी सहकार्य केलेबद्दल सर्व ऊस बागायतदार, ऊस तोड वाहतुक ठेकेदार, हंगामी कामाचे ठेकेदार, सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, कामगार यांचे टेकाळे यांनी आभार मानले. यावेळी सर्वाधिक ऊस » पान २ वर

## राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेमध्ये चैम्पियन स्केटिंग अकॅडमीच्या खेळाडूंचे यश

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २१ ते २३ फेबूरवारी २०२६ रोजी १५ वी मिनी नॅशनल रोल बॉल स्पर्धा (११ वर्ष आतिल मूले/मुली) तिरूची, तामिळ नाडू येथे पार पडल्या या स्पर्धेत बीड जिल्हा संघातून महाराष्ट्र राज्य मुलीच्या संघामध्ये स्वरा सानप, आराध्या नेहरकर व मुलाच्या संघामध्ये चौरे यांची निवड झाली होती. या स्पर्धेत मधे मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले या खेळाडूंना व्यवस्थापक धीरज सिरसाट, प्रशिक्ष विशाल गिरी , वैभव गिरी यांचे मार्गदर्शन मिळाले. या यश बद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशन चे सचिव रामदास गिरी, क्रीडा प्रशिक्षक सुधीर हजारे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आले.

## सोलर युनिट जमा, तरीही माजी मंत्र्याच्या पीए ला ५४ हजारांचे वीज बिल

### महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह ?

**बीड । प्रतिनिधी**

परळी शहरात अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. सोलर युनिट नियमित जमा होत असतानाही स्थानिक आमदार तथा माजी मंत्री यांच्या पी ए प्रशांत जोशी यांना तब्बल ५४ हजार रुपयांचे वीज बिल आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांनाही वाढीव व चुकीची बिले दिली जात असल्याची चर्चा रंगली आहे. संबंधित ठिकाणी सोलर प्रकल्प बसविण्यात आला असून प्रशांत जोशी यांच्या सोलर प्रकल्पलातून ७२हजार रुपयाचा समतुल्य वीज युनिट महावितरण कंपनी कडे जमा असताना देखील जोशी यांना ५४ हजार रुपये चा बिल देण्यात आले तरी देखील महावितरणकडून मोठ्या रकमेचे बिल आकारण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. यापूर्वीही अनेक नागरिकांनी चुकीच्या व अवाजवी बिलांविरोधात तक्रारी केल्या आहेत. मात्र दुरुस्तीऐवजी टोलवाटोलवीची उत्तरे दिली जात असल्याचा » पान २ वर




## हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज भारतीयांचे आराध्य दैवत-संस्कृताचार्य वैद्य

**बीड । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी श्रीरायरेश्वराच्या मंदिरामध्ये श्री शंभू महादेवाला रक्ताभिषेक करत मावळ्यांसह स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती आणि अभिमानाने गर्जना केली की, हे राज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा । अशी तेजस्वी गर्जना करणारे हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे तमाम भारतीयांचे स्फूर्तिदायक आराध्य दैवत आहे असे चिंतनीय विचार प्रमुख वक्ते संस्कृत आचार्य प्रेरक वैद्य यांनी व्यक्त केले.

संस्कार विद्यालयद्वारा आयोजित स्फूर्तीदायक शिवजयंती कार्यक्रमांतर्गत प्रमुख अतिथी म्हणून ते भाष्य करत होते.याप्रसंगी ते म्हणाले की आज आपल्या स्वदेशामध्ये ज्या शिवप्रभूंनी तरुण मावळ्यांच्या सहकार्याने हिंदवी स्वराज्य निर्माण केले त्याच हिंदवी स्वराज्यामध्ये आज तरुण हा स्वजीवनाचा रस्ता भरकटत चालला आहे . छत्रपती



शिवाजी महाराजांनी बल उपासना करून योग ध्यानधारणा करत ज्ञान » पान २ वर

## मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस अमोल राऊत यांच्याकडून सामाजिक उपक्रमातून साजरा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांचा अभिष्टचिंतन सोहळा काल मोठ्या उत्साहामध्ये व विविध सामाजिक उपक्रमातून काल बीड शहरांमध्ये संपन्न झाला. महाराष्ट्र सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी जिल्हा रुग्णालय बीड या ठिकाणी २५,२६ फेब्रुवारी रोजी जन्म झालेल्या कंन्या व त्या मातांना साडी वाटपाचे ,बाळाला ड्रेसचे तसेच केळी व इतर फळांचे वाटप करत सामाजिक बांधिलकी जोपासत हा उपक्रम राबवला तर या उपक्रमाबद्दल त्यांचे शहरवासीयांकडून » पान २ वर



## विवेकानंद बाल विद्यामंदिरात मराठीचा जागर

### ८ वी च्या विद्यार्थ्यांनी भरवले मराठी गौरव भाषा दिनानिमित्त किशोर साहित्य संमेलन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई येथे इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कष्टाच्या कमाईतून आद्यकवी मुकुंदराज स्वामी किशोर साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात आयोजित करत मराठी भाषा गौरव दिन अनोख्या पद्धतीने साजरा केला. आई-वडील व शेजाऱ्यांची छोटी-मोठी कामे करून मिळवलेल्या पैशांचा सदुपयोग करत विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाचा आदर्श घालून दिला. या उपक्रमास संस्थेचे सचिव संतोष कुलकर्णी, संस्थेच्या अध्यक्षा व मुख्याध्यापिका स्वरूपा डिग्रसकर तसेच मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. प्रज्ञा शेलमूकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण



कार्यक्रमाची आखणी, नियोजन व अंमलबजावणी स्वतः केली. मराठी भाषा दिनाचे औचित्य साधत विविध स्पर्धा, साहित्य संमेलन, काव्यवाचन, कथाकथन, परिसंवाद व बक्षीस वितरण अशी विविध सत्रे आयोजित करण्यात आली. सकाळी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, भगवे झेंडे हातात घेऊन पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी फुगडी खेळत सहभाग नोंदवला. संपूर्ण वातावरणात » पान २ वर

## ग्रामरोजगारांचा मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील होणारे सततचे बदल पाहता यामुळे रोजगार सेवक आणि मजुरांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच अनेक मागण्याही प्रलंबित असून या मागण्यांअडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामरोजगार सहाय्यकांनी आज शुक्रवारी (दि.२७) जिल्हा कचेरीवर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन दिले. तसेच यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली. रोजगार हमीचे नाव बदलणे, दरवर्षी होत असलेली निधीची कमतरता, तसेच गुत्तेदार ही यामध्ये घुसले आहेत. यामुळे राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. यामुळे मोठा बदल होत असून, याचा ग्रामरोजगार आणि मजुरांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे हा प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आंदोलकांनी ०३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन » पान २ वर




रणरणत्या उन्हात ग्रामरोजगारांची घोषणाबाजी

## अशोक नगर जि.प.शाळेत मध्यान्ह भोजनामध्ये अळ्या

### ● विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ ●

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जिल्हा परिषदच्या अशोक नगर शाळेत मध्यान्ह भोजनाच्या दर्जाबाबत गंभीर प्रकार समोर आला आहे. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या खिचडी व सोयाबीनमध्ये वारंवार आळ्या आढळून येत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे संबंधित अन्नाची योग्य तपासणी न करता तेच अन्न विद्यार्थ्यांना दिले जात असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. लहान मुलांच्या आरोग्याशी असा



निष्काळजीपणा कसा केला जातो, असा सवाल संतप्त पालकांकडून उपस्थित केला जात आहे. मध्यान्ह भोजन योजना ही विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी राबविण्यात येते; मात्र अशा प्रकारामुळे योजनेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकृष्ट दर्जाचे अन्न दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, तसेच » पान २ वर

## सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या जाण्याने नुकसान झालं. अजित पवारांमुळे राज्यात आणि देशात आपली ओळख निर्माण झाली होती, सामान्य कुटुंबातून ते आले होते. २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले, हे सांगण्यात मला कोणतीही अडचण नाही, असे म्हणत राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणाही करण्यात आली आहे. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्याच सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडेही मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे. अजित दादा २८ जानेवारी दिवशी आपल्यातून निघून गेले, आपल्या सर्वांसाठी ते धक्कादायक होतं. आपल्या सर्वांना प्रश्न होता उद्या आपण काय करणार, कसं करणार? पण



सुनेत्राताईंच्या नेतृत्वात आपला पक्ष काम करेल, असे प्रफुल पटेल यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल, पार्थ पवार, रुपाली चाकणकर छगन भुजबळ यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते.मागच्या महिन्यात आपण पाहिलं की, काहींजण बोलू लागले. आपल्या पक्षात काही संबंध नाही ते काहीही बोलायला लागले, आम्ही काय करायचं ते सांगायला लागले. पोटात एक आणि ओठात एक बोलू लागले. परंतु आपण सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केलं. आपण योग्यवेळी योग्य निर्णय केला. आता, आपल्याला » पान २ वर

## भरदिवसा नगर रोडवर चालत्या दुचाकीवरून दागिने चोरी

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावर सोनसाखळी चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. बुधवारी (दि.२५) सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास शेरी पुलावर दोन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅम सोन्याचे मिनी गंठण भरदिवसा ओरबडून नेले. या झटापटीत महिला स्कुटीवरून पडल्याने नातीसह जखमी झाली आहे. या घटनेमुळे आष्टी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आष्टी तालुक्यातील केरूळ येथील एक महिला आपल्या नातीला कडा येथील दवाखान्यात दाखवण्यासाठी स्कुटीवरून आली होती. उपचार घेऊन त्या गावाकडे परतत असताना, शेरी पुलावर मागून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीवरील दोन अज्ञातांनी महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण ओरबडले. चोरट्यांच्या या ओढाताढीत महिलेचे स्कुटीवरील नियंत्रण सुटले आणि त्या नातीसह खाली पडल्या. यात त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. चोरट्यांनी दीड तोळ्याचे सोन्याचे दागिने लंपास केल्यानंतर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गेल्या आठवडाभरात अंभोरा आणि आष्टी परिसरात अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. भरदिवसा घडणाऱ्या या लुटमारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर या प्रकरणाचा तपास करत आहेत, मात्र वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे पोलीस या चोरट्यांचा शोध घेणार का? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून,
दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव
Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV